<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची तिसावी यादी</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**केंद्र पुरस्कृत पशुधन विमा योजना सांगली जिल्हयामध्ये बंद असल्याबाबत**

**(१) १५२७३ (३०-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत पशुधन विमा योजना सांगली जिल्हयामध्ये दोन वर्षापूर्वी सुरु असलेली पशुधन विमा योजना सन २०१४-१५ मध्ये पशुधन विमा योजना बद असल्याचे माहे जानेवारी या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार पशुधन विमा योजना सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४ - १५ पासुन सदर योजनेचा समावेश राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत करण्यात आलेला आहे व योजनेच्य स्वरुपात देखील बदल करण्यात आलेला आहे. सदर योजनेची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये करण्यासाठी दि.२०.१०.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सदरहु योजनेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

ही योजना नवीन असल्याने, त्यासाठी नवीन लेखाशिर्ष प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही अंतीम टप्यात आहे.

या योजनेची राज्यात अंमलबाजवणी करण्यासाठी केंद्र शासनाकडून जानेवारी, २०१५ मध्ये रु.४९७.७८९४५ लक्ष निधी प्राप्त झालेला असून, त्यास केंद्र शासनाची सन २०१५-१६ मध्ये पुनर्ग्राह्यता प्राप्त करुन घेऊन योजना राबविण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अर्थात डाएट**
**या संस्थेच्या जागेचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२) १५२७४ (०९-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अर्थात डाएट ही संस्था सन १९९५ मध्ये स्थापन झालेली असून त्याचे इमारत बांधण्यासाठी जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महसूल विभागाकडे पाठविलेला असून तो प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाएटची इमारत व सोईसुविधा नसल्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डाएटच्या जागेचा प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत, सदरहू प्रस्ताव तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली या संस्थेस जागा मंजूर होण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

---

**तिरु नदीवरील (ता.जळकोट जि.लातूर) बेरेजसला मंजूरी मिळण्याबाबत**

**(३) १५२८० (११-०४-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरु नदीवरील (ता.जळकोट जि.लातूर) बेरेजसला मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूरी मिळाली असतानाही पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देण्यास नाशिक विभागातर्फे टाळाटाळ होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, कधीपर्यंत देण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सुकन्या योजनेचा निधी जाचक अटींमुळे लाभार्थ्यांना मिळत नसल्याबाबत

**(४) १५२८१ (०९-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींचे शिक्षण व आरोग्यमान उंचवावे, मुलींचा जन्मदर वाढावा, बालविवाह रोखले जावेत, बालिका भ्रूणहत्या थांबवावी या उद्देशाने शासनाने सुरू केलेल्या सुकन्या योजनेचा निधी जाचक अटींमुळे लाभार्थींच मिळत नसल्याने परत करावा लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील पोलीस कर्मचा-यांना बुलेटप्रुफ जॅकेट योग्य प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत

**(५) १५२८७ (०८-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर दहशतवाद्यांच्या रडारवर असल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवादी हल्याला सक्षमपणे तोंड देण्यासाठी आठ हजाराहून अधिक पोलीस कर्मचारी असताना केवळ १०१ बुलेटप्रुफ जॅकेट उपलब्ध करुन दिली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलेटप्रुफ जॅकेट योग्य प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मुंबईत दि.२६.११.२००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गृह मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडे २००० नग बुलेटप्रुफ, जॅकेटची मागणी नोंदिवण्यात आली होती. त्यानुसार गृह मंत्रालया, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सन २०११ मध्ये २००० नग बुलेटप्रुफ जॅकेट महाराष्ट्र पोलीस दलास पुरविले आहेत. त्यापैकी १०४ नग बुलेटप्रुफ जॅकेट पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना वाटप करण्यात आले आहेत.

(२) व (३) सन २०१३-१४ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाकरीता ५००० नगर बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदेतील न्युनतम निविदाकार M/s.Neco Defence System Nagpur यांना ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याकरीता दि.२०.११.२०१३ अनव्ये पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यानुसार M/s.Neco Defence System Nagpur यांनी मालाचा पुरवठा करण्यापूर्वी बुलेटप्रुफ जॅकेटचे सॅम्पल तपासणीकरीता सादर केले होते. सदर बुलेटप्रुफ जॅकेटचे सॅम्पल विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई यांचेमार्फत CFSL, Chandigarh येथे बॅलेस्टिक तपासणीकरीता पाठविण्यात आले होते.

सदरचे सॅम्पल बॅलेस्टिक तपासणीमध्ये अपात्र ठरले होते. त्यामुळे बुलेटप्रुफ जॅकेट मध्ये आवश्यक ती सुधारणा करून पुन्हा सॅम्पल उपलब्ध करून देण्याबाबत M/s.Neco Defence System Nagpur यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.२३.०४.२०१४ रोजी पुन्हा सॅम्पल उपलब्ध करून दिले होते. परंतु सदरचे सॅम्पल दुसऱ्या वेळेसही बॅलेस्टिक तपासणीमध्ये अपात्र ठरले. त्यामुळे पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.२२.१०.२०१४ च्या पत्रान्वये M/s.Neco Defence System Nagpur यांना देण्यात आलेले पुरवठा आदेश रद्द करण्यात आले आहेत.

त्यामुळे बुलेटप्रुफ जॅकेटची सन २०१३-१४ मध्ये खरेदी होऊ शकली नाही. महाराष्ट्र पोलीस दलासाठी ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेटची खरेदी करण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**वणी-वरोरा येथील रेल्वे फाटक बंद असल्यामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय**

**(६) १५३११ (१०-०४-२०१५). श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी-वरोरा येथून वाहतुक मोठया प्रमाणात असून तेथे नेहमी रेल्वे फाटक बंद असल्यामुळे नागरिकांना तासनतास उभे राहून वाट पहावी लागत आहे तसेच त्यामुळे तेथे अपघाताचे प्रमाण सुध्दा वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मार्गावर उड्डाण पुलाचे बांधकाम झाल्यास वणी-वरोरा-घुग्घुस मार्ग दळणवळणासाठी सोईचे होऊन नागरिकांना त्यांचा लाभ घेता येईल यासाठी शासन वणी-वरोरा उड्डाण पूल मंजूर करणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) होय.

(२), (३) व (४) प्रस्तुत उड्डाण पूलाचे काम रेल्वे विभागाकडून मंजूर झाल्यावर तसेच प्राधान्यक्रम, निकष, मंजूरी व निधीच्या उपलब्धतेप्रमाणे हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**उमरखेड, महागाव, पुसद व केळापूर (जि.यवतमाळ) या तालुक्यातील साखर नॉमिनी यांनी साखर स्वस्त धान्य दुकानदारांना न देता परस्पर खुल्या बाजारात विक्री केल्याबाबत**

**(७) १५३२६ (०७-०४-२०१५). श्री. जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड, महागाव, पुसद व केळापूर या तालुक्यातील साखर नॉमिनी यांनी सन २०१० ते २०१३ या कालावधीत साखर स्वस्त धान्य दुकानदारांना न देता परस्पर खुल्या बाजारात विक्री केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषी असणा-या नॉमिनी व अधिकारी यांचे विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-०४-२०१५) :** (१) सन २०१३ मध्ये महागांव तालुक्यात रु.१५,३६,०००/- किंमतीच्या ४८० क्विंटल साखरेचा अपहार झाला आहे.

सन २०१२ मध्ये उमरखेड तालुक्यात रु.१४,१५,०००/- किंमतीच्या ७६५ क्विंटल साखरेचा अपहार झाला आहे.

पुसद व केळापूर तालुक्यात अशी बाब आढळून आली नाही.

(२) महागाव तालुक्यातील साखर नॉमिनी श्री.शैलेश दिलीपराव सुरोशे (कोपरकर) यांच्या विरुद्ध दि.२२ ऑक्टोबर, २०१३ रोजी महागाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा क्र.३१५/२०१३ दाखल केला असून, त्यांच्या स्थावर मालमत्तेवर रु.१५,१६,०००/- चा बोजा दि. १३ मार्च, २०१५ रोजी चढविण्यात आला आहे व रक्कम वसूलीची कार्यवाही चालू आहे.

उमरखेड तालुक्यातील साखर नॉमिनी श्री.शैलेश सुरोशे यांचेकडून रु.१४,१५,०००/- वसुल करण्याबाबतचा आदेश दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी पारित करण्यात आला आहे. नॉमिनी श्री.शैलेश सुरोशे व तत्कालिन तहसिलदार, उमरखेड यांच्या विरुद्ध दि.२३ फेब्रुवारी, २०१५ रोजी फौजदारी गुन्हा क्र.२६/२०१५ उमरखेड पोलिस स्टेशमध्ये दाखल करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील मालेगांव व रिसोड येथील पंचायत समितीच्या नविन इमारत बांधकामास शासनाने मान्यतेबाबत**

**(८) १५३६९ (०९-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगांव व रिसोड येथील पंचायत समितीच्या नविन इमारत बांधकामास शासनाने मान्यता दिली आहे, खरे आहे काय ?

(२) असल्यास, मान्यता प्राप्त पंचायत समितीच्या नविन इमारत बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) सदर इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे संबंधीत कंत्राटदारांनी कामे बंद केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास नविन इमारत बांधकाम करण्याकरीता शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय, याबाबत शासनाची भूमिका काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) पंचायत समिती इमारत बांधकामासाठी योजनेअंतर्गत निधीच्या उपलबधतेनुसार जिल्हा परिषदेला निधी वितरीत केला जातो.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार मालगाव व रिसोड पंचायत समितीसाठी अनुक्रमे रु.२५.०० लक्ष व रु.२५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.वाशिम) येथील आदिवासी लोकांसाठी सांस्कृतिक भवन बांधण्याबाबत**

**(९) १५३७३ (१०-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.वाशिम) येथे २१ खेडयात १०० टक्के आदिवासी लोक राहत असून ही गावे केंद्र शासनाच्या मिनीमाळा पॉकेटमध्ये समाविष्ट आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी बांधवांच्या लोककला, सामूहिक विवाह सोहळे, सांस्कृतिक व सामजिक कार्यक्रम तसेच उत्सव साजरे करण्याकरिता मालेगाव या तालुक्याच्या ठिकाणी रू.१ कोटीचे सांस्कृतिक भवन बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२६-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) या विभागाच्या दिनांक १५ मे, २००४ च्या शासन निर्णयान्वये आदिवासी भागामध्ये सांस्कृतिक संकुल बांधणे या योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद योजनेच्या अटी व शर्तीनुसार आदिवासी सांस्कृतिक संकूल बांधकामासाठी संबंधित ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांनी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासंदर्भात मालेगाव या तालुक्याच्या ठिकाणी सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी १ एकर जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, अकोला यांनी मुख्य कार्यकारी

अधिकारी, जि.प. वाशिम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव आणि तहसिलदार, मालेगाव यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे. परंतु अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने त्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**राज्यातील गडचिरोली, नंदूरबार व वर्धा या तीन जिल्ह्यातील सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) १५३८३ (०७-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडचिरोली, नंदूरबार व वर्धा या तीन जिल्ह्यातील सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१५) :** (१) हे खरे आहे.

तथापि सहायक धर्मादाय आयुक्त संवर्गातील अन्य अधिका-यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

(२) सहायक धर्मादाय आयुक्त संवर्गातील गडचिरोली, नंदूरबार व वर्धा या तीलन जिल्ह्यातील रिक्त पदावर न्यायिक सेवेतील अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्याची विनंती मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायलयाकडे सहायक धर्मादय आयुक्त संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील वनसंपत्ती ही केवळ वनविभागाच्याच दुर्लक्षामुळे नष्ट पावत असल्याची बाब**

**(११) १५३९६ (०९-०४-२०१५). डॉ. राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील वनसंपत्ती ही केवळ वनविभागाच्या दुर्लक्षामुळे नष्ट पावत असल्याची बाब माहे फेब्रुवारी मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर वर्षी झाडे जगवा या मोहिमेवर प्रचंड खर्च करीत असतांना वन विभागाच्या दुर्लक्षामळे वाखारी, ता.देवळा, जि.नाशिक येथे प्रचंड वृक्षतोड झालेली आहे याची शासनास माहिती आहे काय,

(३) असल्यास, या वनसंपत्तीकडे दुर्लक्ष करणा-या संबधित वनविभागाच्या कर्मचा-यांवर गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) देवळा वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या अवकाळी पावसाच्या वादळात वृक्षांची संख्या २९८ असून घन मीटर ३३.७१४ एवढे आहे, सदरचा माल हा वनवसाहत देवळा येथे जमा करण्यात आला आहे. या ठिकाणी वृक्षतोड झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने ३ जून २०१४ च्या केंद्र शासनाच्या सूचनेनुसार हवामान आधारित राज्यात पीकविमा योजना लागू करण्याबाबत**

**(१२) १५४१४ (३०-०४-२०१५). श्री. प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ३ जून २०१४ च्या केंद्र शासनाच्या सूचनेनुसार हवामान आधारित राज्यात पीकविमा योजना लागू केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यात सर्व गावांमध्ये पीक आणेवारी ५० टक्क्यांच्या आत असल्याने २२०० कोटी रूपयांच्या कर्जावर विमा रक्कम बँकामार्फत करण्यात आली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रक्कम विमा कंपन्याकडून तातडीने देण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) होय,
(२) हवामान अधारित पीक विमा योजनेअंतर्गत संदर्भ हवामान केंद्रावर नोंद झालेल्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीनुसार अधिसुचित केलेल्या योयजनेच्या प्रमाणकांनुसार नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत निश्चित केली जाते. शासनाने जाहिर केलेल्या इतर कोणतयाही निकषांचे (पीक पैसेवारी/ आणेवारी, टंचाईसदृष्य परिस्थिती, पूर इ.) आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जात नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, वर्धा जिल्हियामध्ये हवामन अधारित पीक विमा योजना खरीप २०१४ मध्ये सोयाबरीन व कापूस या पिकांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार क्षेत्र घटक धरुन (Area Approach) भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत वर्धा जिल्हयातील कापूस व सोयाबीन पिक घेतलेल्या ३२३५१ शेतकऱ्यांना रु १६.१४ कोटी नुकसान भरपाई रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत संबंधीत बँकाँच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माळेगाव (ता.लोहा, जि.नांदेड) येथील पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(१३) १५४२० (०७-०४-२०१५). श्री. प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव (ता.लोहा, जि.नांदेड) येथील नागरीकांना कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने सन २०१० मध्ये कोट्यवधी रुपये खर्च करुन लिंबोटी धरणावरुन पाणी पुरवठा सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने सदर योजनेचे वीजेचे बील भरले नसल्याने गत पाच वर्षापासून वीज बिला अभावी ही पाणी पुरवठा योजना बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे वीजेचे बिल न भरण्याची कारणे काय आहेत व सदर बिल तातडीने भरुन पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत व थकबाकीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०५-२०१५) :**(१) होय

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रादेशिक पाणी पुरवठा ३ खेडी माळेगाव हि योजना सद्यस्थितीत म.जी.प्रा.या विभागाकडे असून जिल्हा परिषदेकडे अहस्तांतरीत आहे. योजना हस्तांतरणाच्या संयुक्त पहाणीत आढळलेल्या त्रुटींची पुर्तता म.जी.प्रा.कडून अद्याप न झाल्याने योजना जिल्हापरिषदेकडे अद्याप हस्तांतरीत झालेली नाही. सदर योजना अहस्तांतरीत असल्याने वीज देयक भरण्याचे प्रलंबित आहे. श्रीक्षेत्र माळेगावची यात्रा जिल्हापरिषद राबवित असल्याने यात्रा कालावधीत जिल्हा परिषदेकडून यात्रेसाठी पाणी पुरवठा करण्यात आला व योजना चालविण्याकरिता जिल्हापरिषदेने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर योजनामधील त्रुटींची पुर्तता करुन कार्यान्वित करुन जि.प.कडे हस्तांतरीत करण्याबाबत व जिल्हापरिषदेने हस्तांतरीत करुन घेण्याबाबत शासन स्तरावरुन सुचना देण्यात येत आहेत.

---

**पुणे जिल्हा, पुरवठा विभागाच्या निगडी परिमंडळ 'अ' कार्यालयामध्ये दलालांचा हस्तक्षेप वाढल्याबाबत**

**(१४) १५४४२ (०७-०४-२०१५). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा पुरवठा विभागाच्या निगडी परिमंडळ 'अ' कार्यालयामध्ये सामाजिक कार्यकर्ता अशी ओळख सांगत राजकीय वरदहस्त लाभलेल्या अनेक दलालांचा वावर कार्यालयाच्या परिसरात वाढला असून कोणत्याही विधायक पुराव्याशिवाय केवळ कुटुंबातील व्यक्तीच्या नावाचा आधार घेत येथे शिधापत्रिका काढून देण्याचा धंदा राजरोसपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिमंडळ कार्यालयातील कपाटातील महत्वाचे दस्तऐवज व कागदपत्रांमध्ये त्याचा सर्रास हस्तक्षेप असून प्रवेश बंदी असताना थेट पुरवठा कार्यालयात बसून बनावट शिधापत्रिकेचे काम केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने पुरवठा विभागाच्या निगडीतील परिमंडळ 'अ' कार्यालयातील दलालांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) परिमंडळ 'अ' कार्यालयाने निगडी पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडे दलालांवर कारवाई होणेबाबत तक्रार केलेली असून त्याबाबत पोलीस कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राजगुरुनगर (जि.पुणे) येथील हुतात्मा राजगुरु यांचा जन्मस्थळ वाडा आणि दिलावर खान दर्गा व घुमट यांच्या दुरुस्तीबाबत

**(१५) १५४४८ (०७-०४-२०१५). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (जि.पुणे) येथील हुतात्मा राजगुरु यांचा जन्मस्थळवाडा आणि येथील दिलावर खान दर्गा व घुमट पुरात्‍त्व विभागाच्या अधिपत्याखाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील दिलावर खान दर्ग्याचा चार पाच वर्षापासून विकास करण्याचा कार्यक्रम पुरातत्व विभागाने हाती घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घुमटाच्या इमारतीचा काही भाग नैसर्गिकरीत्या पडू लागला असल्याने व या ठिकाणी झाडे झुडपे वाढल्यामुळे नक्षीकाम नष्ट होऊ लागले अ‍ाहे, घुमटाभोवताली असलेली संरक्षण भिंत अनेक ठिकाणी पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दर्ग्याचे आणि घुमटाचे सौदर्य नष्ट होऊ नये म्हणून राजगुरुनगरमधील मुस्लीम बांधवानी अनेकदा पुरातत्व विभागाला आणि शासनाला कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) राजगुरुनगर (जि.पुणे) य‍ेथील हुतात्मा राजगुरु यांचा जन्मस्थळवाडा हा राज्य संरक्षित स्मारक असून ते राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्याअखत्यारीत येते. तसेच दिलावर खान दर्गा व घुमट हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येते.

(२) व (३) होय.

अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीनुसार व आवश्यकतेनुसार दिलवर खान दर्गा येथे जतन व दुरुस्ती कामे करण्यात आली आहेत. सदर स्मारकाची संरक्षक भिंत व घुमट सुस्थितीत असून काही ठिकाणी नैसर्गिकरितया पडझाड झालेली आहे. याकरिता निधीच्या उपलब्धतेनुसार जतन व संवर्धनाची कामे हाती घेण्यात येतील.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा हिवरखेड (ता.तेल्हारा,जि.अकोला) येथील नार्बाड अर्थसहाय्यित ग्रामीण सांडपाणी प्रकल्प सुरु करणेबाबत**

**(१६) १५४७५ (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा हिवरखेड (ता.तेल्हारा,जि.अकोला) येथे नाबार्ड अर्थसहाय्यित ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापनासाठी (RIDF-XIX) योजनेंतर्गत सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी, शासन निर्णय क्र,नाबार्ड-२०१४/प्र.क्र.०४/पापु-०८, दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ चे परिपत्रकानुसार सदर योजनेसाठी प्रकल्प किंमत रूपये ३६६.७७ लाख मंजूर झाले परंतु अद्याप निधी उपलब्ध न झाल्याने काम बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत निधी मंजूर होऊन सहा महिने लोटुनही अद्याप पर्यंत निधी उपलब्ध न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०५-२०१५) :** (१), (२) व (३) होय, नाबार्ड अर्थसहाय्यित ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी (RIDF-XIX) योजनेस लेखाशीर्ष उपलब्ध नव्हेत. सदर योजनेकरिता नवीन लेखीशीर्ष महालेखापाल, मुंबई यांनी दि.२०.२.२०१५ रोजी उपलब्ध करुन दिल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने लेखाशिर्षाबाबतचा शासन निर्णय दि.३०.३.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आला. त्यामुळे सन २०१४-१५ या वर्षाचा निधी नाबार्ड-१९ अंतर्गत कोणत्याही प्रकल्पास उपलब्ध होऊ शकला नाही. तथापि, सन २०१५-१६ मध्ये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तेल्हारा (जि.अकोला) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागी य अधिकारी कार्यालय निर्माण करणेबाबत

**(१७) १५४७६ (१०-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) येथे गेल्या अनेक वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी कार्यालय नसल्याने तेथील कामे संथ गतीने होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेकडून निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उपविभागीय अधिकारी कार्यालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१५) :**(१) दि.९.१२.२०१४ च्या पत्रान्वये मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

---

## यवतमाळ जिल्हा पोलीस दलच्या सेवानिवृत्ती लिपीकांच्या सेवानिृत्त लाभाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१८) १५४८१ (०७-०४-२०१५). श्री. राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या २४ सेवानिवृत्ती पोलीस लिपीकांचा सेवानिवृत्ती लाभाचा प्रस्ताव शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार लाभ देणेबाबत थेट आदेश असतांना गत एकावर्षापासून व त्यापेक्षा अधिकचा काळ उलटूनही अद्याप ही लाभाची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :**(१), (२) व (३) यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या २४ सेवानिवृत्ती पोलीस लिपिकांचा सेवानिवृत्ती लाभाच्या प्रस्तावाबाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार लाभ देण्यात आलेले आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यादवारे शेतीपिकांची होत असलेल्या नुकसानीबाबत**

**(१९) १५४८५ (०९-०४-२०१५). श्री. राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात वन्य प्राण्यांच्या हैदोसाने शेतकरी कमालीचा हवालदिल झाल्याने व शेतीपिकांची नासाडी पशुधनावर होणारे वन्य प्राण्यांचे हल्ले तसेच बिबटया व वाघ यांच्या धुमाकुळामुळे शेतकरी व ग्रामस्थांचे मनात दहशतीचे वातावरण पसरलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ वनपरिक्षेत्रातील आर्णी भागात गेल्या काही महिन्यांपासून बिबटया वाघ, तडस या प्राण्याचा मुक्त संचार होत असल्याने तसेच राखीव वनालगत अनेक शेत जमीन असल्याने शेतक-यांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी वन विनभागाने कोणती उपाययोजना केली वा करीत आहे काय,

(४) अद्यापपावेतो कोणतीही उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- विविध शासन निर्णयान्वये वन्यप्राण्यांद्वारे शेतीपिक नुकसानी, पशुधन हानी, मनुष्य हानी /मृत्यु झाल्यास तात्काळ नुसान भरपाई देण्यात येते.
- तसेच शासन निर्णय दिनांक २५.१.२०१३ अन्वये बाधीत व्यक्तीस तात्काळ आर्थीक मदत मिळण्याकरिता वनपरिक्षेत्राचे सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी यांना प्रकरणे मंजुर करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहे.
- गावक-यांना खबरदारीच्या उपायाबद्दल माहिती देण्यात येते.
- माहिती पत्रके छापुन गावा गावांत वाटण्यात आली आहे.
- ग्रामपंचायतींना लेखी कळवुन खबरदारींच्या उपायाबद्दल माहिती दिली जाते.
- वनअधिकारी/कर्मचारी हे वेळोवेळी ग्रामस्थांसोबत चर्चा करुन त्यांना वस्तुनिष्ठ माहिती देतात.
- ग्रामस्थ/शेतक-यांच्या मनातील भिती घालविण्याचे प्रयत्न करण्यात येतात.
- नुकसानग्रस्त ठरणा-या वन्यप्राण्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावण्यांत येतात.
- गस्ती पथके तयार करुन त्यांचेकडून वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा घेण्यात येतो.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील आदिवासी विकास प्रकल्पातील झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२०) १५४९४ (१०-०४-२०१५). श्री. राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील आदिवासी विकास प्रकल्पातील गैरव्यवहाराबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन शासनाने चौकशी समिती नेमली होती व तद्नुसार ३ ते ७ फेब्रुवारी, २०१५ ला सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता पांढरकवडा आदिवासी प्रकल्प कार्यालयाला सदरील समितीने भेट दिली असून त्यादरम्यान सन २००४ -०५ ते २००८-०९ या काळात विविध योजनांच्या अंमलबजावणीत खोटी कागदपत्रे तयार करुन कोट्यावधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीत काय आढळून आले व त्याबाबत समितीने अहवाल मा.उच्च न्यायालय व शासनाला सुर्पत केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सन २००४-०५ ते २००८-०९ या काळात आदिवासी विकासाकरीता राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त तरतूदी मधून राबविण्यात आलेल्या योजनामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी जनहित याचिका क्र. १५३/२०१२ मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाली होती. याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १५.०४.२०१४ अन्वये मा.श्री.एम.जी.गायकवाड, सेवा नियुक्त न्यायाधिश, मा.उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र आहे. सदर जनहित याचिकेमध्ये नमूद केलेल्या वैयक्तिक तथा सामूहित योजनाच्या अंमलबाजवणी बाबत केलेल्या आरोपांची शहानिशा करणेकरिता प्रत्यक्ष मोका पहाणी करणे/प्रकल्प कार्यालयास भेटी देणे इत्यादी बाबी चौकशी समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट आहेत. या संदर्भात चौकशीसाठी यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा प्रकल्प कार्यालयाला चौकशी समिती सदस्य व त्यांचे सहका-यांनी दि. ०३ ते ०७ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत भेट दिली होती.

सद्यस्थितीत सदर समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे. समितीने मुदतवाढ देण्याबाबत केलेली विनंती विचारा घेऊन शासन निर्णक क्र. जहिया २०१२/प्र.क्र. ८० (भाग ७)/का.१६, दि. १३.०४.२०१५ अन्वये चौकशी समितीस दि. १५.०७.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**राळेगाव (ता राळेगाव जि यवतमाळ) येथील बेबंळा कालव्या अंतर्गत**
**उपकालव्याचे काम स्थानिकांच्या विरोधामुळे रखडल्याबाबत**

**(२१) १५५५४ (०९-०४-२०१५). प्रा. अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव ता राळेगाव जि यवतमाळ येथील बेबंळा कालव्या अंतर्गत उपकालव्याचे बांधकाम राळेगाव शहरालगतच्या शेतजमिनी मधुन प्रस्तावीत असल्याचे दि. १२ जानेवारीला निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याचे बांधकाम राळेगाव शहरालगतच्या शेतजमिनी मधुन गेल्याने स्थानिकांच्या विरोधामुळे बांधकाम रखडल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शेतक-याच्या शेताला पाणी मिळावे यासाठी उपकालव्याचे काम नियोजीत असतांना संबधीत विभागामध्ये निधी उपलब्ध असतांना काम न केल्याने त्या भागातील झालेले शेतक-याचे नुकसान करणा-यावर काय कार्यवाही होईल वा करण्यात येईल,

(४) नसल्यास विलंबनाची कारणे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) राळेगांव वितरीका सुरुवातीस राळेगांव शहरालगतच्या जमिनीतून जात असून या भागातील शेतकऱ्यांनी आरोग्य व सुरक्षितेतेच्या दृष्टीने वितरीका खुल्या कालव्याऐवजी बंद पाईप मधून नेण्याबाबत विनंती केल्यानुसारच Cast-in-place c.c. pipe मधून वितरीका नेण्याच्या प्रस्तावास महामंडळ स्तरावरुन तत्वत: मंजूरी दिली आहे. सदर कामाचे संकल्पना बाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलुर (जि.नांदेड) तालुकयातील होट्टल येथे हेमाडपंथी मंदिर विकास करण्याबाबत.**

**(२२) १५५७२ (०९-०४-२०१५). श्री. डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलुर जि.नांदेड तालुकयातील होट्टल येथे हेमाडपंथी मंदिर सिध्देश्वर, परमेश्वर, पार्वती, खंडोबा, भवानी मंदिर अशी ऐतिासिक परंपरा या गावी लाभलेली आहे. येथील हेमांडपथी मंदिराच कोरीव काम प्रसिध्द असल्याने दुरवरचे भाविक व कलाकार या गावी दर्शन व कोरीव शिल्प पाहण्यासाठी येतात. दोन वर्षापूर्वी होट्टल या नावाचे मेगा टूरिझाम सर्किट डेव्हलपमेंट अंतर्गत विकास करण्यासाठी आराखड्यात मंजूरी मिळाली होती व ३ कोटी रु चा निधीही मंजूर करण्यात आला होता परंतू अद्याप विकास काम करण्यात आली नसल्याने कोट्यावधीचा निधी परत जाण्याच्या मार्गावर आहे. हेमाडेपंथी मंदिराचा विकास त्वरीत करावा अन्यथा

उपविभागीय कार्यालयासमोर उपोष करण्याचे निदेश गावक-यांनी जिल्हाधिकारी यांना दिले असल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले अहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांच्या या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५)** :(१) अशा प्रकारचे निवेदन होट्टल येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिले होते.

(२) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी कळविल्यानुसार ग्रामस्थांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मौ.होट्टील येथील जमिनीचा वाद सामोपचाराने निकाली काढून विकास कामे सुरु करता यावीत, या दृष्टीने अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा, कामाचे प्रकल्प सल्लागार व काही ग्रामस्थ व उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करणारी अर्चकाची मुलगी यांची बैठक घेतली. बैठकीत अर्चकाच्या मुलीस मंदिर व परिसराच्या विकासासाठी रिट पिटीशन मागेघेण्याबाबत विनंती केली तथापि तिने नकार दिल्यामुळे काहीही तोडगा निघून शकला नाही. तथापि प्रकरणाची वस्तुस्थिती ग्रामस्थांच्या वेळीच निदर्शनास आणण्यात आली व प्रष्न समोपचारांने मिटविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रयत्न केले आहेत.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले असून Status Quo Vacate करण्याकरिता शासकीय अभियोक्तामार्फत विनंती करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यात चाऱ्याचा तुटवडा भासत असल्याने जनावरे विक्रीस काढल्याबाबत**

**(२३) १५५७६ (०८-०४-२०१५). श्री. डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ या तीन महिन्याच्या कालावधीत जनावरांसाठी १० लाख ७९ हजार ६८१ टन चा-यांची आवश्यकता आहे, त्यापैकी खरीप हंगामासाठी ७ लाख ९८ हजार ९६३ टन चा-यांची आवश्यकता झाली आहे तर अद्यापही जिल्ह्यातील १४ तालुक्यात २ लाख ८० हजार ७१८ टन चा-याचा तुटवडा भासत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी जनावरे विक्री केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चारा टंचाईवर मात करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०६-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) शहरातील शिधावाटप दुकानदार लाभधारकांना धान्य वाटप करीत नसल्याबाबत**

**(२४) १५५७९ (०७-०४-२०१५). श्री. डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) शहरातील काही शिधावाटप दुकानदार शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणाली व्यवस्थेतंर्गत मिळणारे धान्य शिधावाटप यादीमध्ये नांव असलेल्या अनेक लाभधारकांना अनेक वर्षापासून देत नसल्याची तक्रार तहसिलदार, भोकर यांच्याकडे दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिधावाटप दुकांनाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित शिधावाटप दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :** (१) होय,
अशा आशयाची तक्रार श्री. निलकंठ लक्ष्मणराव वर्षेवार यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार, भोकर यांचेकडे केली आहे.
(२) श्री. वर्षेवार यांचे तक्रारीवरून भोकर शहरातील कार्यान्वित ९ दुकानांची चौकशी करण्यात आली. त्यापैकी १ दुकानदार नियमितप्रमाणे धान्य देत नसल्याचे आढळून आल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी दिनांक ३० मार्च, २०१५ च्या आदेशान्वये सदरच्या दुकानाची १००% अनामत रक्कम जप्त करून परवाना निलंबित केला आहे. तसचे उर्वरित ८ दुकानांपैकी ४ परवानाधारकांचे अभिलेख अद्यावत नसल्याने त्यांची १००% व १ परवानाधारकाची ५०% अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच १ परवानाधारक यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. उर्वरित २ पैकी १ परवानाधारकाना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व १ परवानाधारक यांनी तपासणीच्या वेळी दुकान बंद ठेवल्याने सदर दुकानाची तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार भोकर यांना सूचित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(२५) १५५८० (०९-०४-२०१५). श्री. डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाच्या कार्यालयावर अपु-या सोयीसुविधांमुळे अधिक ताण होत असून हा ताण कमी करण्यासाठी

नांदेड येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाचे उपकेंद्र सुरु करण्याची गरज असून या संदर्भात टाईम्स शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी (नांदेड) यांना निवेदन देऊन नांदेड येथे उपकेंद्र सुरु करण्यासाठी मागणी केल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) लातूर विभागीय मंडळाची स्थापना १९९७ मध्ये औरंगाबाद विभागीय मंडळाचे विभाजन करुन झाली आहे. भौगोलिक परिस्थिती व अल्प विद्यार्थ्यी संख्योचा विचार करता लातूर विभागीय मंडळाचे उपकेंद्र नांदेड येथे सुरु करणे प्रशासकीय व आर्थिकदृष्ट्या सोयिस्कर ठारणार नाही असे राज्यमंडळाने टाईम्स शिक्षक संघटनेस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयात कृषि विद्युत पंपांचे जोडणी प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) १५५८३ (०८-०४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात करोडोच्या संख्येने कृषि विद्युत पंपांचे जोडणीचे अर्ज अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित अर्जांची तालुकानिहाय संख्या किती आहे व या प्रलंबित विद्युत जोडण्यासाठी त्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी विभागांतर्गत कोणते नियोजन करण्यात आले आहे तसेच प्रतिक्षा यादी पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) मार्च २०१५ अखेर वीजजोडणी तालुकानिहाय प्रलंबित कृषीपंपाची संख्या एकूण ३००६ इतकी असून प्रलंबित कृषीपंप जोडणीपैकी १५०० कृषीपंप जोडणीचे कामासाठी कृषीपंप स्पेशल पॅकेज अंतर्गत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यातील १०० पेक्षा जास्त कृषी केंद्राचे परवाने रद्द करण्यात आल्याबाबत**

**(२७) १५५८४ (०८-०४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यातील १०० पेक्षा जास्त कृषी केंद्राचे परवाने रद्द करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कृषि केंद्राचे परवाने रद्द करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कृषि केंद्रांचे परवाने रद्द झाल्यामुळे येणा-या खरीप पिकाची बियाणे शेतक-यांना देण्यासाठी कृषी विभागाने कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्ह्यातील एकूण १७४९ कृषि केंद्रापैकी माहे जुलै, २०१४ मध्ये नुतनीकरणा अभावी व व्यवसाय करत नसल्याने १५१ कृषि केंद्राचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत.

(३) उपरोक्त १५१ कृषि केंद्रांचे परवाने रद्द केल्यानंतरही जिल्ह्यात १५९८ विविध कृषि केंद्र कार्यरत असून असल्याने त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना लागणाऱ्या कृषि निविष्ठा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

---

**गोंदियामधील बीजीडब्ल्यू शासकीय रुग्णालयामध्ये अखंडीत विद्युत पुरवठयासाठी एक्सप्रेस फिडर लाईनची कामे पुर्ण करण्यात आली नसल्याबाबत**

**(२८) १५५८५ (०८-०४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदियामधील बीजीडब्ल्यू शासकीय रुग्णालय मध्ये अखंडीत विद्युत पुरवठयासाठी एक्सप्रेस फिडर लाईन साठी सुमारे ५० लक्ष रुपये निधी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे जमा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप एक्सप्रेस फिडर लाईनची कामे पुर्ण करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त एक्सप्रेस फिडर लाईनचे काम त्वरीत पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) होय.

(२) नाही, सदर एक्सप्रेस फिडर विज वाहिनी उभारणे करण्याचे काम दि.०१.०७.२०११ रोजी सुरु करुन दि.१५.०३.२०१२ रोजी पुर्ण करण्यात आले. सदर एक्सप्रेस विज वाहिनीद्वारे दोनही रुग्णालयाला अखंडीत विज पुरवठा सुरु करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभाग

गोंदियाकडून रोड रुंदीकरणाचे काम सुरु असते वेळी खोदकाम करतांना सदर विज वाहिनीचे केबल वारंवार डॅमेज करण्यात आले, त्याचप्रमाणे उपकेंद्रात ब्रेकरमध्ये बिघाड झाल्यामुळे दि.१५.०९.२०१३ ते ०६.०६.२०१४ पर्यंत वरील विद्युत पुरवठा सुर्याटोल उपकेंद्राचे टाऊन-१ फिडरवर स्थानंतरीत करण्यात आला होता. त्यानंतर सदर कामांची दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा ३३ के.व्ही. फूलचूर उपकेंद्रावरुन एक्सप्रेस फिडरद्वारे विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील नाथसागराच्या सुरक्षिततेबाबत**

**(२९) १५५९३ (०९-०४-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील नाथसागराच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने गुप्तचर विभागाने सुधारणा करण्याबाबत शासनास कळविलेले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर धरणावरील व दोन्ही कालव्याच्या मधील रस्त्याचे कामाचे प्रस्ताव संबंधीत खात्याने शासनास सादर केले आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावरशासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे, वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) होय, ऑगस्ट, २०११ मध्ये विशेष पोली महानिरीक्षक सुरक्षा, राज्य गुप्तवार्ता विभाग (महाराष्ट्र राज्य) दादर मुंबई यांनी राज्यातील मोठ्या धरणांच्या सुरक्षा आढावा घेऊन त्यामधील उणिवा व उपाययोजनेचा तपशील सचिव, जलसंपदा यांना उपलब्ध करुन दिला आहे. त्यामध्ये जायकवाड धरणाचा (नाथसागर जलाशय) समावेश आहे.

(२) होय, मागील वर्षी २०१४-१५ मध्ये जायकवाडी धरणाच्या माथ्यावर असलेलया सेवा रस्ता व धरणाच्या पायथ्याशी धरण भिंतीस समांतर धरण निरीक्षण पथांची दुरुस्ती व डांबरीकरण करणेबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केले होते.

(३) सन २०१४-१५ मध्ये विशेष दुरुस्ती विस्तार व सुधारण अंतर्गत पुरेसा निधी उपलब्ध न होऊ शकल्यामुळे सदरील प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही. त्यामुळे सन २०१५-१६ मध्ये सदरील प्रस्तावाबाबत आढावा घेऊन पुनःश्च सादर करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयास सुचना देण्यात आजली आहे. त्यानुसार प्रस्ताव सुधारित करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात सुरु असलेल नविन ट्रेडचे काम अत्यंत संथगतीने होत असल्याबाबत**

**(३०) १५५९५ (०९-०४-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात सुरु असलेल नविन ट्रेडचे काम अत्यंत संथगतीने होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामासंदर्भात शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील संतपीठ उभारणीचे काम पूर्ण झाले असून संतपीठाचा अभ्यासक्रम शासनाने सुरु करण्याबाबत**

**(३१) १५५९६ (०९-०४-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथील संतपीठ उभारणीचे काम पूर्ण झाले असून शासनाने संतपीठाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगीही दिलेली असतांना प्रत्यक्षात अभ्यासक्रम अद्याप सुरु न झाल्यामुळे हजारो विद्यार्थी सदरील अभ्यासक्रमापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संतपीठाचे अभ्यासक्रम सुरु न होण्याची कारणे काय आहेत व ते तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) औरंगाबद जिल्हातील पैठण येथील संतपीठाच्या इमारतीच बहुतांश काम पूर्ण झाले आहे. संतपीठासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र सदर अभ्यासगटाकडून सर्व सहमतीने अभ्यासक्रमासंदर्भात कोणताही ठोस प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याने अभ्यासक्रम निश्चित करता आला नाही. संतपीठ ही नाविन्यपूर्ण योजना असून राज्य प्रथमतःच सुरु करण्यात येत आहे. संतपीठाचा अभ्यासक्रम सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संतपीठाची प्रशासकीय रचना, अभ्यासक्रम निश्चिती याबबत कार्यवाही सुरु आहे.

---

**सांगली जिल्हयातील मौजे शिराळा येथील नियमित विद्युत सेवा मिळण्याच्या दृष्टीने रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**

**(३२) १५६३३ (०८-०४-२०१५). श्री. शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मौजे शिराळा येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची रोहित्र बंद स्थितीत असून मंडळाच्या येथील उपविभागात अभियंता व लिपिक, तंत्रज्ञ स्तरावरील बरीच पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तालुका डोंगरी तालुका असल्याने सातत्याने होणा-या अतिवृष्टीमुळे अल्प कर्मचारी असल्याने येथील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यात नियमित विद्युत पुरवठा मिळण्याच्या दृष्टीने रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

शिराळा उपविभागात एकूण १२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९ पदे कार्यरत असून, उच्चस्तर लिपिक (लेखा) ची २ पदे व शिपाईचे १ पद रिक्त आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांची पदे पदोन्नतीद्वारे भरण्याबाबत आदेशाीत करण्यात अाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील वाकुर्डे बुद्रुक उपसा जलसिंचन योजनेचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) १५६३५ (०९-०४-२०१५). श्री. शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील वाकुर्डे बुद्रुक उपसा जलसिंचन योजनेचे काम निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू डोंगरी विभागातील शेतक-यांनी आर्थिक व सामाजिक परिस्थिती विचारात घेता सदरहू योजनेसाठी सन २०१५-१६ या अार्थिक वर्षामध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाला उपलब्ध होणा-या निधीतून किमान रुपये १५० कोटी निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री महोदयांना दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबतीत शासनाकडून कोणती कार्यवाह केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) अशंतः खरे आहे.

(२) होय.

(३) या योजनेसाठी सन २०१५-१६ मध्ये रुपये ८.४० कोटी निधीची तरतूद केली आहे. योजनेला जादा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव आवश्यकतेनुसार विचारात घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामशेत (जि.पूणे) शहरातील सुरु असलेले अवैध धंदे तातडीने बंद करण्याबाबत**

**(३४) १५६४५ (०७-०४-२०१५). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामशेत (जि.पूणे) शहरातील सुरु असलेले अवैध धंदे तातडीने बंद करावेत तसेच गंभीर गुन्हे घडूनही रेल्वे पोलीस हद्दीची बाब पुढे करुन गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ करणा-या पोलीसांसह पोलीस अधिका-यांवर कारवाई करण्याच्या मागण्यांसाठी कामशेत पोलीस ठाण्यावर ग्रामस्थांनी व व्यापा-यांनी ठिय्या आंदोलन केल्याचे दि. २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांनुसार पोलीस विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.

(२) या प्रकरणी वडगांव मावळ पोलीस स्टेशनला गु.र.क्र.२१/२०१५ भा.दं.वि. कलम ३२३, ३२४, ३२५, ५०४ प्रमाणे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम शहरामध्ये सुरु असलेल्या रस्ता दुरुस्तीसाठी दगड फोडण्याच्या कामी बालमजूरांना जुंपले गेल्याबाबत**

**(३५) १५६५२ (०७-०४-२०१५). श्री. लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरामध्ये सुरु असलेल्या रस्ता दुरुस्तीसाठी दगड फोडण्याच्या कामी बालमजूरांना जुंपले गेल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०६-०६-२०१५) :** (१) बाल मजुरांकडून दगड फोडण्याचे काम करुन घेण्यात येत असल्याबाबतचे वृत्त दिनांक १२.१२.२०१४ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते.
(२) होय. कामगार आयुक्तालयाच्या क्षेत्रिय कार्यालयाने त्याबाबत चौकशी केली आहे.
(३) व (४) कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता तेथे काम सुरु नसल्यामुळे कामाच्या ठिकाणी बालकामगार काम करताना आढळून न आल्यामुळे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**वाशिम शहरात (जि.वाशिम) नव्याने पिण्याचे जलकुंभ बांधण्याबाबत**

**(३६) १५६५५ (०७-०४-२०१५). श्री. लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम (जि.वाशिम) शहरात वाढीव शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत नव्याने पिण्याचे जलकुंभ बांधले जात असून पालिकेच्या कार्यालयाजवळ यापूर्वी एक जलकुंभ बांधण्यात आले मात्र दुसरी पाण्याची टाकी बांधण्यास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जलकुंभ बांधण्याचे काम महाराष्ट्र जलनिस्सारण मंडळाकडे असून या टाकीच्या बांधकामासाठी ज्या कंत्राटदाराला ठेका देण्यात आला या ठेकेदाराने यापूर्वी एक कोटीपेक्षा जास्त निधी ॲडव्हॉन्स म्हणून घेतला असतानाही बांधकाम सुरु केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधित जलकुंभ (टाकी) चे बांधकाम करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) वाशिम शहरातील वाढीव पाणी पुरवठा योजनेअंतर्ग प्रस्तावित असलेल्या जलकुंभाच्या जागेबाबत उपजिल्हाधिकारी वाशिम यांनी दि. ९/१०२०१३ रोजी पारित केलेल्या अंतिम आदेशाविरुध्द अध्यक्ष मुकुंद एज्युकेशन सोसायटी रिसोड यांनी जिल्हा न्यायालय वाशिम येथे अपील दाखल केले . सदर प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट होते. सदर प्रकरणाची अंतिम सुनावणी एप्रिल, २०१४ मध्ये झाली व नगरपरिषदेच्या पक्षात निर्णय लागला आहे. सदर जागेचा ताबा १७/४/२०१४ रोजी शासनाकडून ताबा घेण्यात आला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वाशिम यांना सदर कामास त्वरीत सुरुवात करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून कळविण्यात आले आहे. सदर कामाबाबतचे कोणतेही अग्रिम रक्कम कंत्राटदारास देण्यात आलेले नाही.

---

**वाशिम जिल्हयातील वन विभाग वनतस्करांकडे दुर्लक्ष करीत असल्याने जिल्हयातील सागवान वृक्षांची अवैध तोड होत असल्याबाबत**

**(३७) १५६६० (०९-०४-२०१५). श्री. लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील वन विभाग वनतस्करांकडे दुर्लक्ष करीत असल्याने जिल्हयातील सागवान वृक्षांची अवैध कत्तल होत असल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सागवान वृक्षांची अवैध कत्तल थांबविण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत वन विभागाला काही सूचना देण्यात आल्या आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) यवतमाळ वनवृत्तांतर्गत वाशिम जिल्हयातील कारंजा, मानोरा वनपरिक्षेत्रात माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये एकूण १३१ सागेतर वृक्षांची अवैध तोड झाली आहे. सदरच्या वृक्षतोडीबाबत एकूण २७ वनगुन्हे नोंदवून ५ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. त्यामळे वाशिम जिल्हयातील वन विभाग वनतस्करांकडे दुर्लक्ष करीत आहे हे खरे नाही.

(२), (३) व (४) वनसंरक्षणाचे अनुषंगाने नियमित नियतक्षेत्रांची तपासणी, नाकाबंदी, गस्ती करताना आढळलेल्या अवैध वृक्षतोडीच्या अनुषंगाने नियमानुसार वनगुन्हे नोंदवून प्रकरणांची चौकशी करण्यात येते.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात करण्यात आलेली वीजबिलात ३५ टक्के कलेली वाढ**

**(३८) १५६६९ (०८-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात करण्यात आलेली वीजबिलात करण्यात आलेली ३५ टक्के वाढ रद्द करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी दापोलीत दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मोर्चा काढण्यात आला,होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजबिलात करण्यात आलेली ३५ टक्के दरवाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) होय.

(२) काही निवडक वर्गवारींना अनुदान देऊन सप्टेंबर २०१३ मध्ये झालेली २० टक्के वीज दरवाढ कमीत कमी राहिल याची दक्षता घेतली होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील ८० लघुसिंचन प्रकल्पाची कामे ६ महिन्यांपासून बंद असल्याबाबत.**

**(३९) १५६७० (०९-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील ८० लघुसिंचन प्रकल्पाची कामे ६ महिन्यांपासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे ८० लघुसिंचन प्रकल्प बंद असण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कामे सुरू करण्याबाबत शासनाकडून कोणती तातडीची कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण ३७ प्रकल्प प्रगतीपथावर असून त्यापैकी रायगडमधील पालभुतवली, पन्हाळघर, काळवाली-धारवली, वडशेतवावे व कोंढाणे या ५ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे बंद आहेत.

(२) वनजमिन, भूसंपदान, अपुरा निधी, गौण खनिजावरील बंदी या कारणांमुळे प्रकल्पांची आवश्यक ती प्रगती साधता आली नाही.

(३) या प्रकल्पांस आवश्यक त्या मंजू-या प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**कणकवली तालुक्यातील तरंदळे ग्रामपंचायत तसेच वरवडे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणा-या पंपाचे मीटरच्या वाढीव बिलाबाबत**

**(४०) १५६७१ (०७-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली तालुक्यातील तरंदळे ग्रामपंचायत तसेच वरवडे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणा-या पंपाचे मीटर बिल सरासरी रुपये अडीच हजार येते, परंतू माहे जानेवारी, २०१५ मध्ये ८४ हजार तसेच ४५ हजार लाईट बिल वीज वितरण कंपनीकडून पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बिलाच्या संदर्भात वरवडे व तरंदळे ग्रामपंचायतीने वीज वितरण कंपनी कणकवली यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारी नुसार वीजवितरण कंपनीने चौकशी केली आहे काय व, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) वीजबिल ठेकेदाराने चुकीचे रिडींग दिल्यामुळे कमी आकारणीची बिले देण्यात आलेली होती. जानेवारी २०१५ मध्ये अचूक मिटर वाचनाप्रमाणे बिजबिले देण्यात आल्यामुळे मागील वापरासह विजबिले देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा रानबोटी (ता. कुही) या गावाचे विस्थापन करुन पुनर्वसन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४१) १५६७३ (०९-०४-२०१५). श्री. सुधीर पारवे (उमरेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा उमरेड, भिवापूर व कुही वन परिक्षेत्राचा समावेश करुणउमरेड क-हांडला वन्यजिव अभयारण्याची निर्मिती करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा रानबोटी (ता.कुही) या गावाचे विस्थापन करुन पुनर्वसन प्रस्तावित करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजा रानबोटी (ता.कुही) गावाचे पुनर्वसन बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे

(४) असल्यास, कार्यवाहीचे सर्व साधारण स्वरुप काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) दिनांक २९.०६.२०१२ च्या शासन अधिसूचनेन्वये नागपूर जिल्हयातील भिवापूर व कुही आणि भंडारा जिल्हयातील पवनी वनपरिक्षेत्राचा भाग समाविष्ट करुन उमरेड क-हांडला अभयारण्याची निर्मिती करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी, उमरेड तथा चौकशी अधिकारी यांनी रानबोडी या गावाची संपूर्ण मालमत्ता शेत जमिनीसह अधिग्रहण करुन गावांचे पुनर्वसन करण्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०३.११.२०१२ नुसार पुर्नवसनाच्या प्रक्रियेअंतर्गत गावात सभा घेऊन पुनर्वसन पध्दती, द्यावयाचा मोबदला बाबत ग्रामस्थांना माहिती देण्यात आली आहे व गावक-यांनी पर्याय I किंवा पर्याय II निवड करुन ठराव देण्यास कळविण्यात आले आहे. गावक-यांनी ग्राम सभेचा ठराव मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना सादर केलेला असून सदर ठरावात त्यांनी शासन निर्णय दि.०३/११/२०१२ मधील तरतूदीपेक्षा जास्त मोबदल्याची मागणी केलेली आहे व पर्याय निवड ठराव दिलेले नाही. गावांत २-३ सभा घेऊन शासन निर्णयामधील तरतूदी पुरेशा व चांगल्या असल्याबाबत समजवून सांगण्यात आले व पर्याय -I व पर्याय -II चे संमिश्रण करुन पर्याय निवडण्याची सुचना केलेली आहे. गावक-यांना ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसित झालेलया नवेगांव व जामणी गावाची भेटसुध्दा करुन देण्यात आली आहे. तसेच पुनर्वसनासाठी जागा सुध्दा दाखविण्यात आली आहे. परंतु अद्याप गावक-यांनी पर्याय निवडून पुनर्वसनास परिपूर्ण सहमती दर्शविलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिचघाट उपसा सिंचन योजनेच्या (ता. कुही, जि.नागपूर,) कामाला प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(४२) १५६७५ (०९-०४-२०१५). श्री. सुधीर पारवे (उमरेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचघाट उपसा सिंचन योजनेच्या (ता.कुही, जि.नागपूर) कामाला दि. ३०.०८.२००८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात सुमारे १४० लक्ष रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, कार्यवाहीचे सर्वसाधारण स्वरुप काय,

(५) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.

(२) सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात रु. २०० लक्ष ची तरतूद करण्यांत आली आहे.

(३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची कलम ११ (च) अंतर्गत मान्यता मिळवणे, उपसा सिंचन योजनांच्या परिगणांना स्थायी समितीची मान्यता मिळवणे इ.कामे प्रगतीत आहे. सदर मान्यता प्राप्त झालेनंतर योजनेचे प्रत्यक्ष काम हाती घेता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्पाचे नियोजनानुसार काम प्रगतीपथावर आहेत.

---

**गोंदिया जिल्हयात देवरी ग्रामपंचायत येथील नळ योजनेबाबत**

**(४३) १५६९० (०९-०४-२०१५). श्री. संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात देवरी ग्रामपंचायत येथील नळ योजनेसाठी २२ कोटी मंजूर झाले अहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या करिता लोकवर्गणी ८६ लाख भरावयाचे होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काम सुरु आतसना अचानक लोक वर्गणी माफ करण्यात आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याचा खुलासा करावा ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

देवरी वाढीव पाणी पुरवठा योजनेला शासनाने दिनांक २१.०४.२०१२ रोजी रु१७६६.०१ लक्ष इतक्या (ढोबळ) किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

(२) व (३) शासन निर्णयानुसार लोक वर्गणीचा हिस्सा ५% रु ८८.३०/- लक्ष ग्रामपंचायतीने भरायचे होते. तथापि, मा. मंत्रिमंडळाच्या दि.०२ जुलै, २०१४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणीची अट शासनाने दि.०९.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पुर्णत: रद्द केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात**
**घरकुलाकरिता अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १५७२६ (१०-०४-२०१५). श्री. संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील देवरी, आमगाव व सालेकसा येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात मागील अनेक वर्षांपासून घरकुल करिता केलेले अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्जाच्या मागणीनुसार बीपीएलमध्ये असणाऱ्या आदिवासी गरजूंना घरकुल दिलेले जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणीआदिवासी विभागाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सन २००३-०४ ते २०१३-१४ या कालावधीत एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, देवरी अंतर्गत गोंदिया जिल्हयातील देवरी, आमगांव व सालेकसा या तालुक्यात अनुक्रमे ४९७, ९२ व १७५ अर्ज घरकुलासाठी प्राप्त झाले. त्यापैकी देवरी, आमगांव व सालेकसा तालुक्यातील लाभार्थ्यांना अनुक्रमे १०, ०८ व ०७ घरकुल मंजुर झालेले आहेत. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, देवरी यांना एकूण रु.९८.४० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरीत प्रलंबित अर्जाबाबत इतर योजनेतून घरकुल मंजूर झाले किंवा नाही याबाबत पंचायत समितीकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता पंचायत समिती, देवरी, आमगांव व सालेकसा यांचेकडे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, देवरी यांनी यादी पडताळणीकरिता पाठविली आहे. त्यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र अद्‌याप अप्राप्त आहेत.

---

## भंडारा जिल्ह्यातील सांस्कृतिक भवनाची वास्तु वापराविना पडून असल्याबाबत

**(४५) १५७२८ (०७-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरात कलावंताना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच जिल्ह्यात सांस्कृतिक वारसा जोपासला जावा या उद्दात हेतूने शासनाने शहराच्या केंद्र स्थानी कोट्यवधी रुपये खर्च करुन भव्य सांस्कृतिक भवन उभारले परंतु सदर वास्तू वापराविना पडून असल्यामुळे तेथे असामाजिक कृत्य मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विनावापर पडून असलेले सांस्कृतिक भवनकडे प्रशासकीय विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचेही दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर सांस्कृतिक भवनाच्या वापराकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०६-२०१५) :** (१) जिल्हा नियोजन समिती (विकास मंडळ), जि.भंडारा यांचे मार्फत, मंजूर रु.१११८,३३०/- निधीमधून सन १९८६ मध्ये भंडारा येथे सांस्कृतिक भवन बांधण्यात आले सन १९९८ पासून सदर इमारत बंद आहे तथापि, तेथे असामाजिक कृत्य होत असल्यास निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) सदर सांस्कृतिक भवन इमारतीचे बांधकाम जिर्ण झाले असल्याने ती निर्लेखित करणे योग्य असल्याचे अभिप्राय जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिले आहेत.

तसेच भंडारा येथे अन्य ठिकाणी नविन नाट्यगृह बांधकामाच्या प्रस्तावाबाबत नगर परिषद, भंडारा यांचेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी, भंडारा यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना तालुक्यातील नेरमध्ये वनरक्षक अधिकाऱ्यांच्या राहण्यासाठी असलेल्या स्वतंत्र निवासस्थानाची दयनीय अवस्था

**(४६) १५७४१ (०९-०४-२०१५). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना तालुक्यातील नेरमध्ये वनरक्षक अधिकाऱ्यांच्या राहण्यासाठी असलेल्या स्वतंत्र निवासस्थानाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून सदर निवासस्थाने जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नेर-सेवली परिसर डोंगर परिसर म्हणून ओळखला जात असून या ठिकाणी कायम वनरक्षक हजर नसल्याने वृक्षांची मोठया प्रमाणात कत्तल होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०५-२०१५)** :(१) नेर येथे पूर्वी बीट मुख्यालय असल्याने, वनरक्षकांसाठी निवासस्थान होते. त्यानंतर २०१० मध्ये पूर्नरचेमुळे नेरे येथील बिट मुख्यालय हलवून खांदेवाडी येथे ठेवण्यात आले. त्यामुळे वनरक्षकाचा निवास नाही. या कारणास्तव नेर येथील जुन्या निवासस्थान इमारतीची अवस्था खालावलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारणी, मेळघाट या आदिवासी भागामध्ये पाण्यापुरवठ्याकरिता भारत निर्माण व राष्ट्रीय पेयजल योजनेवर कोट्यवधी रूपयांच्या निधीचा योग्य उपयोग झाला नसल्याबाबत**

**(४७) १५७४७ (०७-०४-२०१५). श्री. प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारणी, मेळघाट हा सर्व भाग आदिवासी असल्यामुळे पाण्यासाठी भारत निर्माण व राष्ट्रीय पेयजल योजनेवर कोट्यवधी रूपयांचा निधी दिलेला आहे तरीसुध्दा येथे पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधीचा योग्य उपयोग झालेला नसून या सर्व कामामध्ये ठेकेदारांनी मनमानी करून निकृष्ट व अपुरी केलेली आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्हयातील धारणी व चिखलदरा तालुक्यात भारत निमार्ण कार्यक्रम व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १५६ कामे प्रस्तावित होते. आतापर्यंत १४० कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. उन्हाळयात काही गावात उद्भव अपूरे पडत असल्यामुळे तसेच सदर तालुक्यात अनियमित व कमी दाबाचा विजपुरवठा होत असल्यामुळे काही नळ पाणी पुरवठा याेजना बंद राहतात. चालु वर्षाचे मंजुर पाणी टंचाई कृती आराखडयामध्ये चिखलदरा तालुक्यातील टंचाईग्रस्त १४ गावांना टँकरने पाणी पुरवठा

करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत ४ गावांना टँकरने पाणी पुरवठा सुरु केला आहे. त्यापैकी ढोमणीफाटा या गावाला दि.१५.४.२०१५ पासून राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम योजनाद्वारे पाणी पुरवठा सुरु करुन टँकर मुक्त करण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उक्त पाणी पुरवठा योजनांसाठी मंजुर निधीचा योग्य उपयोग झाला असून कोठेही निकृष्ट व अपुरी कामे केलेली नाहीत. अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष अमरावती यांनी तपासणी केलेली आहे. त्यांच्या अहवालानुसार पुर्ण झालेल्या व सुरु असलेल्या कामाची गुणवत्ता योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या लाखो विद्यार्थ्यांचे दोन वर्षापासून 'ईबीसी' चे शुल्क प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) १५८०६ (०९-०४-२०१५). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या लाखो विद्यार्थ्यांचे 'ईबीसी' चे शुल्क दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीच न आल्याने अशा विद्यार्थ्यांची कॉलेजाकडून अडवणूक केली जात असून कॉलेजचे पूर्ण शुल्क भरा नंतरच परिक्षा फी भरा, असा आदेशच पॉलिटेकनिक कॉलेजने काढला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार अशा कॉलेजांवर शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) होय.

(२) सदर बाब शसनाच्या निदर्शनास आली नाही.

(३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या दि.२४/२/२०१५ चे पत्रानुसार सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना मळविण्यात आले आहे. दरम्यान या विभागाच्या शासन निर्णय दि.२४ मर्च, २०१५ नुसार सन २०१३-१४ या वर्षाचे प्रलंबित इ.बी.सी. चे शुल्क अदा करणेसाठी आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परराज्यातील कंपन्यांना महाराष्ट्रातून दुध खरेदी करण्यास घातलेल्या बंदी

**(४९) १५८४३ (३०-०४-२०१५). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परराज्यातील कंपन्याला महाराष्ट्रातून दूध खरेदी करण्यास घातलेल्या बंदी संबंधींच्या निर्णयास शासनाने नुकताच स्टे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू स्टे मुळे दुध उत्पादकांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे काय,

(३) सदरहू परराज्यतील दुध संकलनास घातलेल्या बंदीमुळे सुमारे ५० लाख लिटर दुध शिल्लक राहिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकाराची चौकशी करण्यात आली आहे काय व त्या चौकशीत काय आढळू आले ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०५-२०१५) :**(१) तत्कालीन सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि.१०.२.२०१५ रोजी गुजरातमधील ४ दूध संघ व महाराष्ट्रातील १ अशा एकूण ५ दूध संघांना त्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची सुनावणी संपेपर्यंत महाराष्ट्र राज्यात दूध संकलन करण्यास मनाई करणारा आदेश पारित केला होता. तदनंतर वरील ५ प्रतिवादी संघांना त्यांची बाजू मांडण्यासाठी व अपीलाकरीता कालावधी मिळावा म्हणून सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी स्वत:च्याच वरील आदेशास दि.१३.२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये अंतरिम आदेशाद्वारे स्थगिती दिली आहे, हे खरे आहे.

(२) दि.१६.१२.२०१४ रोजी मा.विधानसभा अध्यक्ष व मा.मुख्यमंत्री यांच्या समवेत संबंधीत लोकप्रतिनिधींच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे राज्यातील सहकारी दूध संघांकडील अतिरिक्त दूध शासन शासकीय दराने स्विकारीत असल्यामुळे दूध उत्पादकांचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सदर स्थगितीमुळे दूध उत्पादकांचे नुकसान होत असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांच्या समोरील प्रशासकीय चौकशी प्रलंबित असतानाच सदर चौकशी त्वरीत व समय मर्यादेत पूर्ण करण्याच्या प्रमुख मागणीसह व अन्य मागण्यांसह काही सहकारी दूध संघांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२०७२/२०१५ व २०७७/२०१५ दाखल केल्या आहेत. सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) मलःनिस्सारण प्रकल्पाला अतिरिक्त १३५ कोटी देण्यास केंद्र शासनाने नाकार दिल्याबाबत**

**(५०) १५८५६ (०८-०४-२०१५). श्री. सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) मलःनिस्सारण प्रकल्पाला अतिरिक्त १३५ कोटी देण्यास केंद्र शासनाने नकार दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत केंद्र शासनाने नकार देण्याची कारणे काय आहेत, यावर शासनाने केंद्र शासनाने कोणत्या प्रकारचा पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुपये १३४.९० कोटी किंमतीच्या मलनिस्सारण प्रकल्पास जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मान्यता दिलेली आहे. तथापि सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी वितरीत करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) व (३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मान्यता दिलेले तथापि केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडून दिनांक ३१ मार्च, २०१४ पूर्वी निधी वितरीत करण्यात आलेला नाही असे प्रकल्प नामंजूर समजण्यात यावे असे केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाकडून केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. तथापि केंद्र शासनाने सदर प्रकल्प नामंजूर समजण्यात यावेत व केंद्र शासनाकडून नव्याने घोषित होणा-या योजनेमध्ये सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सदर प्रस्ताव फेरसादर करता येऊ शकतील असे कळविण्यात आलेले आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.